राज्यात सन २०१० मध्ये सुरू केलेल्या इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळांना स्व[illegible]य्य तत्वावर परवानगी देणे बाबत

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः इंमाशा-१७१४/प्र.क्र.२५०/एसएम- २
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: २९ सप्टेंबर, २०१७

वाचा -

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमांक-नप्राशा-१०१०/(१४६/२०१०)/ प्राशि-३, दिनांक २८/०५/२०१०
२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमांक-नप्राशा-२०११/(१६२/२०११)/ प्राशि-३, दिनांक २५/०९/२०१२
३) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनिमय) अधिनियम, २०१२, दिनांक ०४ जानेवारी, २०१३
४) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनिमय) अधिनियम, २०१२ (दुसरी सुधारणा) अधिनियम २०१३, दिनांक ०२ जुलै, २०१३
५) शासन आदेश, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमांक-नप्राशा-२०११/(१६२ अ/११)/ प्राशि-३, दिनांक ३०/०८/२०१३
६) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन), नियम, २०१६, दिनांक १३ एप्रिल, २०१६
७) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. इंमाशा-१७१४/ प्र.क्र.२५०/एसएम-२, दिनांक ३१ मे, २०१७
८) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. प्राशिस-२०१७/नखाप्राशा/इंशामा२०१०-११/७१११/प्रशा-५१३, दि. २०.०९.२०१७

प्रस्तावना -

शासनाने संदर्भाधिन क्र. (१) येथील दिनांक २८ मे, २०१० च्या परिपत्रकान्वये इंग्रजी माध्यमाच्या कायम विना अनुदान तत्वावरील खाजगी संस्थांमार्फत प्राथमिक शाळा सुरू करण्याचे प्रस्ताव मार्गाविण्यात आले होते. या जाहिरातीच्या अनुषंगाने एकूण ७४७५ अर्ज प्राप्त झाले होते. सदर अर्जांची छाननी जिल्हास्तरीय समितीने केल्यानंतर राज्यस्तरीय समितीने प्राथम्यक्रम ठरवून ३११५ ठिकाणी शाळा सुरू करण्याच्या शिफारशी केलेल्या होत्या. सदर ३११५ शाळांचे प्रस्ताव मंत्रीमंडळ उपसमितीच्या विचारार्थ सादर करण्यात आले होते. मंत्रीमंडळ उपसमितीने दिलेल्या

२३/१०/१७
कनिष्ठ लिपीक
आवक शाखा
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग
पान-१

निर्णयानुसार या ३११५ शाळांच्या प्रस्तावामधील शाळांना परवानगी देण्याकरिता संदर्भाधीन क्र. (२) येथील दिनांक २५ सप्टेबर, २०१२ च्या शासन निर्णयान्वये निकष निश्चित करण्यात आले होते. या शासन निर्णयातील तरतुदीनुसार उपरोक्त प्रस्तावाची तपासणी करुन पात्र ठरणाऱ्या ७५५ शाळांचा प्रस्ताव शिक्षण संचालक(प्राथमिक),पुणे यांनी शासनास सादर केला होता.

२. दरम्यान, राज्यात महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ दिनांक ०४ जानेवारी, २०१३ पासून अंमलात आला. त्यामुळे सदर अधिनियम अंमलात येण्यापूर्वी जाहिरातीद्वारे मागविण्यात आलेले सर्व अर्ज रद्द करण्याचा निर्णय शासनाने संदर्भाधिन क्र. (५) येथील दिनांक ३० ऑगस्ट, २०१३ अन्वये घेतला. तथापि, बऱ्याच संस्थांनी त्यांच्या शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर मान्यता मिळेल या आशेने शाळा सुरु केलेल्या आहेत.

३. महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियम) अधिनियम २०१२ राज्यात लागु झाला असल्याने सद्यस्थितीत कायम विना अनुदान तत्वावर शाळांना परवानगी देण्याचे धोरण नाही. परंतु कायम विनाअनुदान तत्वावर शाळेस परवानगी म्हणजे कोणतेही अनुदान केव्हाही देय नाही व स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर परवानगी देण्यात येणाऱ्या शाळांनादेखील कोणतेही अनुदान केव्हाही देय नाही हेच सुत्र लागू आहे. शासनाने सन २०१० मध्ये जाहिरात देवून इंग्रजी माध्यमाच्या शाळा कायम विना अनुदान तत्वावर सुरू करण्याचे परिपत्रक काढले होते. तद्नंतर महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियम) अधिनियम, २०१२ राज्यात लागु झाला आहे. तथापि, सन २०१० मध्ये इंग्रजी माध्यमाकरिता प्रस्ताव दाखल केलेल्या शाळांपैकी काही शाळा सन २०१० पासून व काही त्यानंतर राज्यात आजतागायत सुरू आहेत. सदर इंग्रजी शाळा ह्या बहुतांशपणे शहरी भागात आहेत. सदर शाळांना स्वयंअर्थसहाय्य तत्वावरील जागेबाबतच्या अटीचे पालन करणे अवघड होत आहे. सदर शाळेमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना परिक्षा देण्याच्या अडचणी येत आहेत. या सर्व बाबी विचारात घेता, सन २०१० पासून सुरु असलेल्या इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळांना स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर परवानगी देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निणय:-

सदर शासन निर्णयासोबतच्या सहपत्रात नमुद करण्यात आलेल्या ५७ प्राथमिक शाळा (इयत्ता १ ली ते ५ वी, इंग्रजी माध्यम) स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर सुरु करण्यास शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे. सदर शाळांनी खालील अटी व शर्तींचे

अटी व शर्ती:-

I) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ मधील तरतूदीनुसार शाळेसाठी पक्की इमारत व आवश्यक सर्व भौतिक सुविधा व शैक्षणिक सुविधांची पूर्तता करणे आवश्यक राहील. भौतिक सुविधांची पूर्तता होत नसल्यास त्याची पुर्तता ६ महिन्याच्या कालावधीत करणे आवश्यक राहील. याबाबतची जबाबदारी, संबंधित शाळांच्या संस्थाचालकांवर राहील.

II) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ मधील तरतुदींच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात आलेले व यापूढे विहित करण्यात येणारे आदेश, अधिसूचना, शासन निर्णय, शासन परिपत्रक इत्यादींचे पालन करणे बंधनकारक राहील.

III) संबंधित शिक्षण संस्थांनी खेळासाठीचे मैदान संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांसोबत (जिल्हा परिषद/महानगरपालिका/नगरपालिका/ नगरपरिषदा/ कटक मंडळे इ.) सामंजस्य करार (MOU) करणे बंधनकारक राहील. संबंधित शिक्षणाधिकारी यांच्याकडे अशा करारपत्राची प्रत प्रथमत: आगाऊ स्वरुपात सादर केल्यानंतर शिक्षणाधिकारी यांच्याकडून मान्यता देण्यात येईल.

IV) शैक्षणिक शुल्क हे महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ नुसार विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क निर्धारणाबाबत कार्यवाही करणे आवश्यक राहील.

V) सोबतच्या यादीतील शाळेबाबत किंवा संबंधित संस्थेबाबत गंभीर स्वरुपाच्या तक्रारी अथवा आर्थिक अधिनियमिततेच्या गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नसाव्यात.

२. सदर आदेश संबंधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

३. उपरोक्त बाबींची पूर्तता संबंधित शाळा करीत असल्यास या शासन निर्णयाच्या दिनांकापासून १ महिन्याच्या आता प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्याच्या शिक्षणाधिकाऱ्याकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा त्यानुसार प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचे संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी उपरोक्त निकषांचे पूर्तता होत किंवा नाही याची तपासणी करुन पात्र होणाऱ्या शाळांची प्रथम मान्यता देण्याची कार्यवाही करावी.

४. संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादीमध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल.

५. युडायस डाटा:- या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना,"*स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा*" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन करुन घेण्याची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता "स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील 'परवानगी प्राप्त नवीन शाळा" असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

६. परवानगी देण्यात आलेल्या शाळेस शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतुदी व त्यानुषंगाने निर्गमित करण्यात आलेले आदेश व नियम यांचे पालन करणे बंधनकारक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

स्वा. म. नानल

(स्वा.म. नानल)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
३. मा. मंत्री, (शालेय शिक्षण), मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांचे खाजगी सचिव
४. आयुक्त, (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे
५. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
६. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. शिक्षण संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
९. सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक)
१०. सर्व कार्यासने, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
११. निवडनस्ती (एसएम २).

| शासन निर्णय क्रमांकः इंमाशा-१७१४/प्र.क्र.२५०/एसएम- २, दिनांक २९ सप्टेंबर, २०१७ सोबतचे सहपत्र | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| अ.क्र. | जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता | शाळेचे नाव व पत्ता | शाळेचा प्रकार |
| १ | पुणे | साई प्रसाद शिक्षण संस्था जळोची, ता. बारामती जि. पुणे | डॅफोडिल्स इंग्लिश मिडीयम स्कूल, जंक्शन (आनंदनगर) ता. इंदापूर, जि. पुणे | प्राथमिक |
| २ | पुणे | सरस्वती हॅपी चिल्ड्रन्स स्कूल, | सरस्वती हॅपी चिल्ड्रन्स स्कूल, माऊली सोसायटी, साई पार्क, दिघी, पुणे | प्राथमिक |
| ३ | पुणे | अभिमन्यु चौधरी फौंडेशन इंद्रायाणीनगर, भोसरी, पुणे | ब्रिलियंट सिटी पब्लिक स्कूल, धावडेवस्ती, भोसरी | प्राथमिक |
| ४ | पुणे | श्री. नारायणगाव गुरु समिती, | गुरु नारायणगांव विद्यालय, गहुंजे, साईनगर, ता. मावळ, जि. पुणे | प्राथमिक |
| ५ | पुणे | मॉ. दुर्गा शक्ती महिला संस्था, कोंढवा, पुणे | किडस आर कीड्स नॅशनल इंग्लिश मिडीयम स्कूल कोंढवा, पुणे | प्राथमिक |
| ६ | सातारा | प्रज्ञा एज्युकेशन सोसायटी, मस्करवाडी (भोंदवडे), ता.जि. सातारा | गुरुकुल इंग्लिश मेडियम स्कूल, भोंदवडे, ता.जि. सातारा | प्राथमिक |
| ७ | कोल्हापूर | ज्ञानकला शिक्षण संस्था, कोल्हापूर | ज्ञानकला इंग्लिश मेडियम स्कूल, उचगांव ता. करवीर, जि. कोल्हापूर | प्राथमिक |
| ८ | कोल्हापूर | ज्ञानहो विद्यामंदिर शिक्षण प्रसारक मंडळ, कोल्हापूर | ज्ञानहो विद्या मंदिर इंग्लिश मेडियम स्कूल, कोल्हापूर | प्राथमिक |
| ९ | नांदेड | अभिनव भारत जनविकास प्रतिष्ठाण, नांदेड | स्वामी विवेकानंद स्कूल ऑफ स्कॉलर्स, मगनपूरा, आनंदनगर, नांदेड | प्राथमिक |
| १० | नांदेड | अभिनव भारत जनविकास प्रतिष्ठाण, नांदेड | विवेकानंद पब्लिक स्कूल, दिलीपसिंग कॉलनी, गोवर्धन घाट वजिराबाद, नांदेड | प्राथमिक |
| ११ | नांदेड | महात्मा बस्वेश्वर बहुउद्देशिय सेवाभावी संस्था हाणेगाव, ता. देगलूर, जि. नांदेड | यशोदिप इंग्लिश स्कूल, हाणेगाव, ता. देगलूर, जि. नांदेड | प्राथमिक |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२ | धुळे | मातोश्री कोकीळा आई शैक्षणिक व बहुउद्देशिय संस्था, धुळे ता.जि. धुळे | स्वामी विवेकानंद इंग्लिश मेडियम स्कूल, वलवाडी, ता.जि. धुळे | प्राथमिक |
| १३ | ठाणे | सकिना एज्युकेशनल ट्रस्ट, अशोकनगर, वाशीनाका, आर.सी. मार्ग, चेंबूर, मुंबई | एस.एस.ए. ग्लोबल स्कूल, हिल रोड, खडवली (पूर्व), ता. कल्याण, जि. ठाणे | प्राथमिक |
| १४ | ठाणे | होम ऑफ पिस फाऊंडेशन, सीवूड, दारावे, नवी मुंबई | इडेन अॅकडमी, साईस्थान, प्लॉट नं. ४,५ आणि ६, से. २९, नेरुळ पूर्व, नवी मुंबई | प्राथमिक |
| १५ | ठाणे | नागसेन शिक्षण प्रसारक मंडळ गाळेगाव मोहने जि. ठाणे | न्यु मॉडेल इंग्लिश स्कूल, कल्याण, | प्राथमिक |
| १६ | ठाणे | हरिश्चंद्र नथुजी कोथमिरे एज्युकेशन ट्रस्ट | झिऑन इंग्लिश स्कूल, काल्हेर, भिवंडी | प्राथमिक |
| १७ | ठाणे | श्री. साई ज्योती एज्युकेशनल ट्रस्ट | श्री. साई ज्योती इंग्लिश स्कूल, कोपरखैरणे, सेक्टर-४ नवी मुंबई | प्राथमिक |
| १८ | ठाणे | कै. पी. एन बेडेकर शिक्षण संस्था, आगासन, दिवा पू., जि. ठाणे | बेडेकर इंग्लिश स्कूल, आगासन, दिवा पू., ठाणे | प्राथमिक |
| १९ | ठाणे | कठोक चॅरिटेबल ट्रस्ट, C/O काठोके मसाला मिल्स, शास्त्रीनगर, कोपररोड, डोंबिवली (प) जि. ठाणे | द. के.सी.टी. प्रायमरी स्कूल, अगासन, प्लॉट नं. १४२, पैकी दातिवली रोड रेल्वे स्टेशन, दिवा, ठाणे | प्राथमिक |
| २० | ठाणे | श्री. गजानन शिक्षण संस्था, डोंबिवली (प) | श्री. गणेश बाल विकास विद्यामंदिर. गुप्ते रोड, डोंबिवली (पू) | प्राथमिक |
| २१ | ठाणे | एस.एस. चौबे एज्युकेशन सोसायटी, मानपाडा गणेश नगर, ठाणे (प.) | नवोदय इंग्लिश स्कूल, मनोरमा, नगर ठाणे (प.) | प्राथमिक |
| २२ | ठाणे | सप्तश्रृंगी शिक्षण प्रसारक मंडळ, शनी मंदीराच्या मागे, अटाळी आंबिवली, ता. कल्याण, जि. ठाणे | कै. गजानन हिरु पाटील इंग्लिश स्कूल, अटाळी आंबिवली, ता. कल्याण | प्राथमिक |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २३ | ठाणे | ज्ञानश्री विद्या प्रसारक मंडळ, विचारे निवास शांतीनगर, रोड नं. २७, वागळे, ठाणे | श्री. इंग्लिश स्कूल, शांती नगर रोड नं. २७, वागळे इस्टेट, ठाणे | प्राथमिक |
| २४ | ठाणे | राज एज्युकेशनल ॲड चॅरिटेबल ट्रस्ट, जैन मंदिर जवळ, नाकोडा बिल्डींग, चि. मानपाडा, जि. ठाणे | एस.आर. इंग्लिश मिडीयम स्कूल, सुतारवाला व्हीला अशोक मुठे चाळ, रमेशवाडी, बदलापूर | प्राथमिक |
| २५ | लातूर | मिना बहुउद्देशिय सेवाभावी संस्था, ता. उदगिर, जि. लातूर | झैन इंग्लिश स्कूल, उदगीर, खतीब कॉलनी, शल्हाळ रोड, उदगीर, जि. लातूर | प्राथमिक |
| २६ | नाशिक | गुरुकुल एज्युकेशन सोसायटी, नाशिक | अभिज्ञान इंग्लिश मिडीयम स्कूल, प्लॉट नं. ५० रो हाऊस नं.२ प्रियंका गार्ड रो हाऊस स.नं. ३६/बी/२ओ/ खुटवड नगर, नाशिक-७ | प्राथमिक |
| २७ | नाशिक | गुरुकुल एजयुकेशन सोसायटी, नाशिक | अभिज्ञान इंगिल्श मिडीयम सकूल, रो हाऊस नं.०८ पोकार कॉलनी, दिंडोरी रोड नाशिक | प्राथमिक |
| २८ | रायगड | लक्ष्मीमाता चॅरिटेबल ट्रस्ट्र, गोल्डन, कामोठे ता. पनवेल जि. रायगड | रायझिंग सन प्रायमरी स्कूल, कामोठे ता. पनवेल जि. रायगड | प्राथमिक |
| २९ | रायगड | श्री. समर्थ सामाजिक व शैक्षणिक संस्था मुक्काम जुई कामोठे ता. पनवेल, जि. रायगड | श्री. सुविदया विद्यालय, कामोठे कॉलनी ता. पनवेल जि. रायगड | प्राथमिक |
| ३० | रायगड | उदय नारायण एज्युकेशन ट्रस्ट, ता. पनवेल | लिटल ॲंजल स्कूल, तळोजे, पाचनंद, पनवेल ता. पनवेल | प्राथमिक |
| ३१ | रायगड | अर्चना चॅरिटेबल ट्रस्ट, जी/६०, ३१/३२ सेक्टर १२ खारघर, नवी मुंबई | वंडर लॅन्ड स्कूल, जी/६०, ३१/३२ सेक्टर १२ खारघर, नवी मुंबई | प्राथमिक |
| ३२ | रायगड | संकल्प चॅरिटेबल ट्रस्ट, तळ मजला, प्लॉट क्र. बी | स्व. बाळाजी कान्हा पाटील हायस्कूल, मोहा पो. उलवा, ता. पनवेल, जि. | प्राथमिक |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | ४०, अष्टविनायक बिल्डींग मराठी शाळेजवळ से. २० नेरुळ, नवी मुंबई, मुंबई-६ | रायगड | |
| ३३ | अकोला | श्री. बालादेवी बहुउद्देशिय शिक्षण संस्था पातूर, जि. अकोला | बालदेवी इंग्लिश स्कूल पातूर, जि. अकोला | प्राथमिक |
| ३४ | बुलढाणा | याशिनिया मुस्लीम एज्युकेशन सोसायटी, मलकापूर, जि. बुलढाणा | युनिक कॉन्व्हेंट, (सालीपूरा) मलकापूर, जि. बुलढाणा | प्राथमिक |
| ३५ | बुलढाणा | ज्ञानदिप बहुउद्देशिय संस्था, बुलढाणा | ज्ञानदिप इंग्लिश स्कूल, पातूर्डा ता. संग्रामपूर, जि. बुलढाणा | प्राथमिक |
| ३६ | बुलढाणा | मुक्ताई बहुउद्देशिय सेवाभावी शिक्षण संस्था, बुलढाणा | मुक्ताई कॉन्व्हेंट, माळविहिर ता.जि. बुलढाणा | प्राथमिक |
| ३७ | औरंगाबाद | स्वामी विवेकानंद बहुउद्देशिय सेवाभावी विकास संस्था, १५६ अमरजवान, नंदनवन, औरंगाबाद | स्वामी विवेकानंद पब्लिक स्कूल, गट नं. २४, शरणापूरा, | प्राथमिक |
| ३८ | औरंगाबाद | कै. गोपीनाथ दलाल बहुउद्देशिय सेवाभावी संस्था, औरंगाबाद | गोपीनाथ पब्लिक स्कूल, कुशलनगर, जालना रोड, औरंगाबाद | प्राथमिक |
| ३९ | औरंगाबाद | संवर्धन बहुउद्देशिय सेवाभावी संस्था, औरंगाबाद | महाराष्ट्र भूषण पब्लिक स्कूल, संस्कार विद्यालय, मोंडा रोड गंगापूर, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद | प्राथमिक |
| ४० | औरंगाबाद | कै. गोपीनाथ दलाल बहुउद्देशिय सेवाभावी संस्था, औरंगाबाद | गोपीनाथ पब्लिक स्कूल, आयप्पा मंदीराजवळ, सातारा परिसर, औरंगाबाद | प्राथमिक |
| ४१ | अमरावती | ग्रेस मिनिस्ट्री, जि. अमरावती | सेंट जेम्स इंग्लिश स्कूल, मोर्शी, ता. मोर्शी जि. अमरावती | प्राथमिक |
| ४२ | वाशिम | राजे शिवाजी बहुउद्देशिय कला/क्रीडा व शिक्षण संस्था, पार्डी आसरा ता. | जिजाऊ प्रायमरी इंग्लिश स्कूल रिठद, ता. रिसोड, जि. वाशिम | प्राथमिक |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | रिसोड, जि. वाशिम | | |
| ४३ | वाशिम | नागराज क्रीडा शिक्षण व बहुउद्देशिय संस्था, सोमठाणा, ता. मानोरा, जि. वाशिम | कॉन्व्हेंट ऑफ स्कॉलरी अॅन्ड इंग्लिश प्रायमरी स्कूल, मानोरा, जि. वाशिम | प्राथमिक |
| ४४ | वाशिम | मॉ. जगदंबा बहु. शिक्षण क्रीडा व व्यायाम प्रसारक संस्था, मंगरुळपीर | स्वामी विवेकानंद प्राथ. शाळा, सोनखास, ता. मंगरुळपीर, जि. वाशिम | |
| ४५ | वाशिम | संत रविदास बहुउद्देशिय व शिक्षण संस्था नवीन सोनखस मंगरुळपीर ता. मंगरुळपीर जि. वाशिम | ज्ञानकाशी प्रायमरी इंग्रजी स्कूल महाराणा प्रताप चौक मं.पीर | प्राथमिक |
| ४६ | वाशिम | संत रविदास मागासवर्गीय बहुउद्देशिय शिक्षण संस्था, करंजी ता. मालेगाव | ब्रिलीयंट प्रायमरी इंग्रजी स्कुल, कवठळ, ता. मंगरुळपीर | प्राथमिक |
| ४७ | वाशिम | छत्रपती संभाजी महाराज बहुउद्देशिय शिक्षण संस्था, वाशिम, ता.जि. वाशिम | जिजाऊ ज्ञान मंदिर प्रायमरी इंग्लिश स्कूल, कळंबा ता. मालेगांव जि. वाशिम | प्राथमिक |
| ४८ | यतवमाळ | राजश्री शाहू महाराज बहुउद्देशिय शैक्षणिक विकास संस्था, कोळंबा ता.जि. यवतमाळ | बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंग्लिश मिडीयम स्कूल, जि. यवतमाळ | प्राथमिक |
| ४९ | यतवमाळ | शिवराई बहुउद्देशिय शिक्षण संस्था पाटणबेरी | न्यु. फ्रेन्डस इंग्लिश मिडीयम स्कूल, पाटणवेरी ता. पांढरकवडा, जि. यवतमाळ | प्राथमिक |
| ५० | वर्धा | गुरुदेव बहुउद्देशिय ग्रामिण विकास संस्था समुद्रपूर, ता. समुद्रपूर जि. वर्धा | ज्ञान सागर ज्ञानपीठ इंग्लिश स्कूल, जाम ता. समुद्रपूर जि. वर्धा | प्राथमिक |
| ५१ | वर्धा | आधार ग्रामीण विकास बहुउद्देशिय संस्था, कोरा ता. समुद्रपूर जि. वर्धा | न्यु सुमेधा कॉन्व्हेट कोरा (वासी) ता. समुद्रपूर जि. वर्धा | प्राथमिक |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५२ | जळगाव | आदर्श बहुउद्देशिय संस्था, पिंपळगाव ता. पाचोरा जि. जळगाव | श्रध्दा इंग्लिश मिडीयम स्कूल, पिंपळगांव ता. पाचोरा जि. जळगाव | प्राथमिक |
| ५३ | नागपूर | राज एज्युकेशन सोसायटी, चंदननगर, मसाळा कामठी नागपूर | एम.बी. पब्लिक स्कूल, मसाळा, ता.कमाठी, जि. नागपूर | प्राथमिक |
| ५४ | नागपूर | साईनाथ अॅग्रो एज्युकेशन सोसायटी, १६ दामोधर लेआऊट, नागपूर | वसुंधरा कॉन्व्हेंट इंग्लिश मिडीयम स्कूल, बाजारगांव जि. नागपूर | प्राथमिक |
| ५० | जालना | छत्रपती शिवाजी महाराज सेवाभावी संस्था, शहागड, ता. अंबड जि. जालना | दिप इंग्लिश स्कूल, शहागड, ता. अंबड, जि. जालना | प्राथमिक |
| ५६ | जालना | संताई बहुउद्देशिय सेवाभावी संस्था, इंदेवाडी ता.जि. जालना | आदर्श इंग्लिश स्कूल, इंदेवाडी, ता.जि. जालना | प्राथमिक |
| ५७ | चंद्रपूर | संस्कृती शिक्षण संस्था, चंद्रपूर | नटराज इंग्लिश स्कूल, रमाबाईनगर, चंद्रपूर | प्राथमिक |

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर दर्जावाढ करण्यासाठी २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१८/प्र.क्र.१३७८/एसएम-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: २५ फेब्रुवारी, २०१९

प्रस्तावना :- सरस्वती हॅपी चिल्ड्रेन स्कुल,पुणे संचलित सरस्वती हॅपी चिल्ड्रेन स्कुल,साई पार्क,दिघी,जि.पुणे या शाळेस स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर दर्जावाढ करण्यासाठी मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर झाला होता. सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

२.१ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत सरस्वती हॅपी चिल्ड्रेन स्कुल,पुणे संचलित सरस्वती हॅपी चिल्ड्रेन स्कुल,साई पार्क,दिघी,जि.पुणे या इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळेला जोडून माध्यमिक (इयत्ता ६ वी ते १० वी, इंग्रजी माध्यम, राज्यमंडळ ) अशी सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून दर्जावाढ करण्यासाठी खालील अटी व शर्तीची पूर्तता करण्याच्या अधीन राहून शासन परवानगी देण्यात येत आहे.

२.२ अटी व शर्ती-

१) सदर संस्थेने रुपये १५०००/- इतक्या रकमेचे नवीन चलन, रुपये १५ लक्ष इतक्या रकमेची तीन वर्ष मुदतीची मुदतठेव पावती, अद्ययावत बँक बॅलन्स प्रमाणपत्राची प्रत, लगतच्या तीन वर्षाचे लेखापरीक्षण अहवालाच्या प्रती, संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्याकडे तीन महिन्याच्या आत सादर करणे आवश्यक आहे. सदर कालावधीत पुर्तता न केल्यास शाळेची मान्यता आपोआप रद्द समजण्यात येईल.

२) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

३) संबधित शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे:-

अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

ब) व्यवस्थापनास सन २०१८-१९ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले असल्याने शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल.

(४) परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळेस i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

(५) संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

(६) संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल.

(७) यु-डायस डाटा:- या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा / दर्जावाढ शाळा बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना,"*स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा*" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणें; संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता " स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा / दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा" असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

(८) परवानगी दिलेल्या स्वयंअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

३. सदर आदेश संबधित संस्थेस १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

२५.०२.२०१४

(रा.वि.कुडले)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
३. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे ,
६. शिक्षणाधिकारी,जिल्हा परिषद (प्राथमिक / माध्यमिक), पुणे,